रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 1 ] नई दिल्ली, अगस्त 15-21, 2019/24-30 श्रावण (शक) 1941 [खंड 18
No. 1 ] NEW DELHI, AUGUST 15-21, 2019/24-30 SHRAVAN (SAKA) 1941 [Vol. 18
अं. १ ] नवी दिल्ली, ऑगस्ट १५-२१, २०१९/२४-३० श्रावण (शके) १९४१ [खंड १८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, अगस्त 15-21, 2019/24-30 श्रावण (शक) 1941

(1) दि ऑल इंडिया सर्व्हिसेस एक्ट, 1951, (2) दि प्रोबेशन ऑफ ऑफेण्डर्स एक्ट, 1958, (3) दि ओथस् एक्ट, 1969, (4) दि अॅथोरिटेटिव्ह टेक्स्टस् (सेन्ट्रल लॉज) एक्ट, 1973, (5) दि गव्हर्नर्स (इमॉल्युमेन्टस्, अलॉउन्सेस अॅन्ड प्रिव्हिलेजेस) एक्ट, 1982, (6) दि सेन्ट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स (रिझर्व्हेशन इन अॅडमिशन) एक्ट, 2006, (7) दि मेन्टेनन्स अॅण्ड वेल्फेअर ऑफ पेरेन्ट्स अॅण्ड सिनियर सिटिझन्स एक्ट, 2007, (8) दि अनऑर्गनाईज्ड वर्कर्स सोशल सिक्युरिटी एक्ट, 2008, (9) दि नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी एक्ट, 2008, (10) दि बर्थस्, डेथस् अॅण्ड मॅरेजेस रजिस्ट्रेशन एक्ट, 1886, (11) दि डिपार्टमेंटल इन्क्वायरीज (इन्फोर्समेंट ऑफ अटेंडन्स ऑफ विटनेसेस अॅण्ड प्रॉडक्शन ऑफ डॉक्युमेंटस्) एक्ट, 1972, (12) दि प्रि-कन्सेप्शन अॅण्ड प्रि-नेटल डायग्नोस्टिक टेक्निक्स (प्रोहिबिशन ऑफ सेक्स सिलेक्शन) एक्ट, 1994, (13) दि ग्राम न्यायालयाज् एक्ट, 2008, (14) दि नॅशनल फूड सिक्युरिटी एक्ट, 2013, (15) दि प्रोहिबिशन ऑफ एम्प्लॉयमेंट अॅज मॅन्युअल स्कॅव्हेन्जर्स अॅण्ड देअर रिहॅबिलिटेशन एक्ट, 2013 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, AUGUST 15-21, 2019/24-30 SHRAVAN (SAKA) 1941

The Translation in Marathi of (1) The All-India Services Act, 1951, (2) The Probation of Offenders Act, 1958, (3) The Oaths Act, 1969, (4) The Authoritative Texts (Central Laws) Act, 1973, (5) The Governors (Emoluments, Allowances and Privileges Act, 1982, (6) The Central Educational Institutions (Reservation in Admission) Act, 2006, (7) The Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act, 2007, (8) The Unorganised Workers' Social Security Act, 2008, (9) The National Investigation Agency Act, 2008, (10) The Births, Deaths and Marriages Registration Act, 1886, (11) The Departmental Inquiries (Enforcement of Attendance of Witnesses and Production of Documents) Act, 1972, (12) The Pre-Conception and Pre-natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) Act, 1994, (13) The Gram Nyayalayas Act, 2008, (14) The National Food Security Act, 2013, (15) The Prohibition of Employment as Manual Scavengers and their Rehabilitation Act, 2013 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली, ऑगस्ट १५-२१, २०१९/२४-३० श्रावण (शके) १९४१

पुढील अधिनियमांचे म्हणजे (१) दि ऑल इंडिया सर्व्हिसेस ॲक्ट, १९५१, (२) दि प्रोबेशन ऑफ ऑफेंडर्स ॲक्ट, १९५८, (३) दि ओथस् ॲक्ट, १९६९, (४) दि ॲथोरिटेटिव्ह टेक्स्टस् (सेंट्रल लॉज) ॲक्ट, १९७३, (५) दि गव्हर्नर्स (इमॉल्युमेन्टस्, अलॉवन्सेस ॲण्ड प्रिव्हिलेजेस) ॲक्ट, १९८२, (६) दि सेंट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स (रिझर्व्हेशन इन ॲडमिशन) ॲक्ट, २००६, (७) दि मेंटेनंस ॲण्ड वेल्फेअर ऑफ पेरेंटस् ॲण्ड सिनियर सिटिझन्स ॲक्ट, २००७, (८) दि अनऑर्गनाईज्ड वर्कर्स सोशल सिक्युरिटी ॲक्ट, २००८, (९) दि नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी ॲक्ट, २००८, (१०) दि बर्थस्, डेथस् ॲण्ड मॅरेजेस रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८८६, (११) दि डिपार्टमेंटल इन्क्वायरिज (इन्फोर्समेंट ऑफ अटेंडन्स ऑफ विटनेसेस ॲण्ड प्रॉडक्शन ऑफ डॉक्युमेंटस्) ॲक्ट, १९७२, (१२) दि प्रि-कन्सेप्शन ॲण्ड प्रि-नेटल डायग्नोस्टिक टेक्निक्स (प्रोहिबिशन ऑफ सेक्स सिलेक्शन) ॲक्ट, १९९४, (१३) दि ग्राम न्यायालयाज् ॲक्ट, २००८, (१४) दि नॅशनल फूड सिक्युरिटी ॲक्ट, २०१३, (१५) दि प्रोहिबिशन ऑफ एम्प्लॉयमेंट ॲज मॅन्युअल स्कॅव्हेन्जर्स ॲण्ड देअर रिहॅबिलिटेशन ॲक्ट, २०१३ या अधिनियमांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रसिद्ध करण्यात येत असून प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २, खंड (क) अन्वये हा अनुवाद त्या अधिनियमांचे प्राधिकृत पाठ आहेत असे समजले जाईल.

# राष्ट्रीय अन्वेषण अभिकरण अधिनियम, २००८

## (२००८ चा अधिनियम क्रमांक ३४)

[ ०१ नोव्हेंबर, २०१८ रोजी यथाविद्यमान]

[३१ डिसेंबर, २००८.]

**भारताचे सार्वभौमत्व, सुरक्षा व एकात्मता, राज्यांची सुरक्षा, परराष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध यांमध्ये बाधा आणणाऱ्या अपराधांचे आणि आंतरराष्ट्रीय तह, करार, अभिसंधी व संयुक्त राष्ट्रे, त्यांची अभिकरणे आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांचे ठराव अंमलात आणण्यासाठी अधिनियमित केलेल्या अधिनियमांखालील अपराधांचे अन्वेषण करण्याकरिता आणि खटला भरण्याकरिता, राष्ट्रीय स्तरावर अन्वेषण अभिकरण घटित करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी संसदेकडून तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रयुक्ती.**

**१.** (१) या अधिनियमास, राष्ट्रीय अन्वेषण अभिकरण अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण भारतास लागू आहे, आणि—

(क) भारताबाहेर असलेल्या भारताच्या नागरिकांना ;

(ख) शासनाच्या सेवेतील व्यक्ती, त्या जेथे जेथे असतील तेथे त्यांनाही ; आणि

(ग) भारतात नोंदणी झालेली जहाजे व वायुयाने यांमधील व्यक्ती, त्या जेथे जेथे असतील त्यांनाही, लागू असेल.

**व्याख्या.**

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अभिकरण " याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेले राष्ट्रीय अन्वेषण अभिकरण, असा आहे ;

१९७४ चा २. (ख) " संहिता " याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, असा आहे ;

(ग) " उच्च न्यायालय " याचा अर्थ, ज्याच्या अधिकारितेत विशेष न्यायालय स्थित असेल, ते उच्च न्यायालय, असा आहे ;

(घ) " विहित " याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ङ) " सरकारी अभियोक्ता " याचा अर्थ, कलम १५ अन्वये नियुक्त केलेला सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता, असा आहे ;

(च) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(छ) " अनुसूचित अपराध " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला अपराध, असा आहे ;

(ज) " विशेष न्यायालय " याचा अर्थ, कलम ११ किंवा, यथास्थिति, कलम २२ अन्वये घटित केलेले विशेष न्यायालय, असा आहे ;

(झ) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि संहितेमध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, संहितेत अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

(२) ज्या क्षेत्रात या अधिनियमाची कोणतीही अधिनियमिती किंवा त्याची कोणतीही तरतूद अंमलात नसेल, त्या क्षेत्राच्या संबंधात, अशा कोणत्याही अधिनियमितीसंबंधीच्या किंवा कोणत्याही तरतुदीसंबंधीच्या निर्देशाचा अन्वयार्थ, त्या क्षेत्रात अंमलात असलेल्या तत्सम कायद्याचा किंवा त्या तत्सम कायद्याच्या संबंधित कोणत्याही तरतुदीचा निर्देश, म्हणून लावण्यात येईल.

प्रकरण दोन

## राष्ट्रीय अन्वेषण अभिकरण

**राष्ट्रीय अन्वेषण अभिकरण घटित करणे.**

**३.** (१) पोलीस अधिनियम, १८६१ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारला, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमांखालील अपराधांचे अन्वेषण करण्यासाठी व खटला भरण्यासाठी, राष्ट्रीय अन्वेषण अभिकरण म्हणून ओळखले जाणारे एक विशेष अभिकरण घटित करता येईल. १८६१ चा ५.

(२) केंद्र सरकारला याबाबतीत जे आदेश काढता येतील, अशा कोणत्याही आदेशांना अधीन राहून, अभिकरणाच्या अधिकाऱ्यांना, अनुसूचित अपराधांचे अन्वेषण करण्याच्या व अशा अपराधांतील संबंधित व्यक्तींना अटक करण्याच्या संबंधात, पोलीस अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी घडणाऱ्या अपराधांचे अन्वेषण करण्याच्या संबंधात जे अधिकार, कर्तव्ये, विशेषाधिकार व दायित्वे असतात, तसेच अधिकार, कर्तव्ये, विशेषाधिकार व दायित्वे, संपूर्ण भारतभर असतील.

(३) केंद्र सरकारला याबाबतीत जे आदेश काढता येतील, अशा कोणत्याही आदेशांना अधीन राहून, अभिकरणाच्या उप-निरीक्षकाच्या दर्जाच्या किंवा त्याच्यापेक्षा वरच्या दर्जाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, संपूर्ण भारतात, त्या त्या वेळी तो ज्या क्षेत्रात उपस्थित असेल, त्या क्षेत्रातील पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या कोणत्याही अधिकारांचा वापर करता येईल आणि अशा अधिकारांचा वापर करताना, त्यास पूर्वोक्त अशा कोणत्याही आदेशाला अधीन राहून, त्याच्या ठाण्याच्या हद्दींमध्ये अशा अधिकाऱ्याची कार्ये पार पाडणारा, त्या पोलीस ठाण्याचा तो प्रभारी अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

**राष्ट्रीय अन्वेषण अभिकरणाचे अधीक्षण.**

**४.** (१) अभिकरणाचे अधीक्षण हे केंद्र सरकारकडे निहित असेल.

(२) अभिकरणाचे प्रशासन हे, केंद्र सरकारने याबाबतीत नियुक्त केलेल्या व महासंचालक म्हणून पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याकडे निहित असेल, तो, केंद्र सरकारकडून याबाबतीत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, राज्याच्या पोलीस दलाच्या संबंधात पोलीस महासंचालकाला वापरता येण्याजोगे असतील, अशा अधिकारांचा, अशा अभिकरणाच्या संबंधात वापर करील.

**अभिकरण घटित करण्याची रीत व सदस्यांच्या सेवाशर्ती.**

**५.** या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, विहित करण्यात येईल अशा रीतीने अभिकरण घटित करण्यात येईल आणि अभिकरणामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या सेवाशर्ती या, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

प्रकरण तीन

## राष्ट्रीय अन्वेषण अभिकरणाद्वारे अन्वेषण

**अनुसूचित अपराधांचे अन्वेषण.**

**६.** (१) कोणत्याही अनुसूचित अपराधाच्या संबंधात संहितेच्या कलम १५४ अन्वये माहिती व त्याचे अभिलेखन मिळाल्यावर, पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी, राज्य शासनाकडे तात्काळ त्याचा अहवाल पाठवील.

(२) पोटकलम (१) खालील अहवाल मिळाल्यावर, राज्य शासन, तो अहवाल, शक्य तितक्या शीघ्रतेने केंद्र सरकारकडे पाठवील.

(३) राज्य शासनाकडून अहवाल मिळाल्यावर, केंद्र सरकार, राज्य शासनाकडून उपलब्ध झालेल्या किंवा इतर स्रोतांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, सदर अपराध अनुसूचित अपराध आहे किंवा नाही आणि तसेच, अपराध व इतर संबंधित घटकांची तीव्रता लक्षात घेता, हा अपराध अभिकरणाने अन्वेषण करण्यायोग्य बाब आहे किंवा कसे, याबाबत निर्णय घेईल.

(४) केंद्र सरकारच्या मते सदर अपराध हा अनुसूचित अपराध असेल आणि ती अभिकरणाने अन्वेषण करण्यायोग्य बाब असेल त्याबाबतीत, केंद्र सरकार, उक्त अपराधाचे अन्वेषण करण्यासाठी अभिकरणाला निदेश देईल.

(५) या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचित अपराध करण्यात आला असून या अधिनियमान्वये त्याचे अन्वेषण करण्याची आवश्यकता आहे, असे केंद्र सरकारचे मत असेल तर, उक्त अपराधाचे अन्वेषण करण्यासाठी अभिकरणाला, स्वतःहून निदेश देता येईल.

(६) पोटकलम (४) किंवा पोटकलम (५) अन्वये कोणताही निदेश देण्यात आलेला असेल त्याबाबतीत, राज्य शासन व अपराधाचे अन्वेषण करणारा राज्य शासनाचा कोणताही पोलीस अधिकारी, अन्वेषणाच्या संबंधात कार्यवाही करणार नाही आणि संबंधित दस्तऐवज व अभिलेख अभिकरणाकडे तात्काळ पाठवील.

(७) शंकानिरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, अभिकरण सदर प्रकरणाचे अन्वेषण हाती घेईपर्यंत, अन्वेषण चालू ठेवणे हे त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

**राज्य शासनाकडे अन्वेषण हस्तांतरित करण्याचा अधिकार.**

**७.** या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाचे अन्वेषण करताना, अपराधाची व इतर संबंधित घटकांची तीव्रता लक्षात घेता, अभिकरणाला—

(क) तसेच करणे इष्ट वाटत असेल तर, अन्वेषणासंबंधात प्रत्यक्ष सहकार्य करण्यासाठी राज्य शासनाला विनंती करणे इष्ट वाटत असेल तर, तसे करता येईल ; किंवा

(ख) केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, अपराधाचे अन्वेषण व न्यायचौकशी करण्यासाठी राज्य शासनाकडे ते प्रकरण हस्तांतरित करता येईल.

**संबंधित अपराधांचे अन्वेषण करण्याचा अधिकार.**

**८.** कोणत्याही अनुसूचित अपराधाचे अन्वेषण करताना, जो अपराध आरोपीने केला असल्याचे अभिकथन केले असेल, असा अपराध अनुसूचित अपराधाशी संबंधित असेल तर, अशा इतर कोणत्याही अपराधाचेही अन्वेषण अभिकरणाला करता येईल.

**राज्य शासनाने राष्ट्रीय अन्वेषण अभिकरणाला साहाय्य करणे.**

**९.** राज्य शासन, अनुसूचित अपराधांचे अन्वेषण करण्यासाठी अभिकरणाला सर्व साहाय्य व सहकार्य करील.

**राज्य शासनाचा अनुसूचित अपराधांचे अन्वेषण करण्याचा अधिकार.**

**१०.** या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही अनुसूचित अपराधाचे, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील अन्य अपराधांचे, अन्वेषण करण्याच्या आणि त्याबाबत खटला भरण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारांना बाधा पोचणार नाही.

## प्रकरण चार

## विशेष न्यायालये

**विशेष न्यायालये घटित करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**११.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचित अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी, या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी, किंवा अशा प्रकरणासाठी किंवा प्रकरणांच्या वर्गासाठी अथवा गटासाठी, एक किंवा अधिक विशेष न्यायालये घटित करील.

(२) कोणत्याही विशेष न्यायालयाच्या अधिकारितेविषयी कोणताही प्रश्न उद्भवला असेल त्याबाबतीत, तो प्रश्न केंद्र सरकारकडे निर्देशित करण्यात येईल व त्याबाबतीत केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल.

(३) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या शिफारशीवरून, केंद्र सरकारने नियुक्त करावयाचा न्यायाधीश हा, विशेष न्यायालयाच्या अध्यक्षपदी असेल.

(४) अभिकरणाला, विशेष न्यायालयाच्या अध्यक्षपदी न्यायाधीशाची नियुक्ती करण्यासाठी, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीकडे अर्ज करता येईल.

(५) पोटकलम (४) खालील अर्ज मिळाल्यावर, मुख्य न्यायमूर्ती, शक्य तितक्या लवकर व सात दिवसांच्या आत, विशेष न्यायालयाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली जाण्यासाठी न्यायाधीशाच्या नावाची शिफारस करील.

(६) केंद्र सरकारला, आवश्यकता वाटल्यास, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या शिफारशीवरून, विशेष न्यायालयासाठी अतिरिक्त न्यायाधीशाची किंवा न्यायाधीशांची नियुक्ती करता येईल.

(७) कोणतीही व्यक्ती, विशेष न्यायालयाची न्यायाधीश किंवा अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त केली जाण्यासाठी, ती अशा नियुक्तीच्या लगतपूर्वी, कोणत्याही राज्यात सत्र न्यायाधीश किंवा अतिरिक्त सत्र न्यायाधीश नसेल तर, अर्ह ठरणार नाही.

(८) शंकानिरसनार्थ, याद्वारे अशी तरतूद करण्यात येत आहे की, विशेष न्यायालयाची न्यायाधीश म्हणून किंवा अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त झालेली व्यक्ती, ती ज्या सेवेत असेल त्या सेवेत तिला लागू असलेल्या नियमांन्वये नियत सेवावधीच्या वयास पोहोचल्यावर, असा न्यायाधीश किंवा अतिरिक्त न्यायाधीश म्हणून ती त्या पदावर राहण्याच्या संबंधात कोणताही परिणाम होणार नाही आणि केंद्र सरकारला, आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या विनिर्दिष्ट दिनांकापर्यंत किंवा तिच्यासमोरील प्रकरणाची किंवा प्रकरणांची न्यायचौकशी पूर्ण होईपर्यंत, ती न्यायाधीश म्हणून त्या पदावर राहील.

(९) विशेष न्यायालयात कोणत्याही अतिरिक्त न्यायाधीशाची किंवा न्यायाधीशांची नियुक्ती केली असेल त्याबाबतीत, विशेष न्यायालयाच्या न्यायाधीशाला, वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, तो स्वतः आणि अतिरिक्त न्यायाधीश किंवा अनेक अतिरिक्त न्यायाधीश यांच्यासह सर्व न्यायाधीशांमध्ये विशेष न्यायालयाच्या कामकाजाचे वाटप करण्यासाठी आणि तसेच, त्याच्या अनुपस्थितीत किंवा कोणत्याही अतिरिक्त न्यायाधीशाच्या अनुपस्थितीत तातडीच्या कामकाजाचा निपटारा करण्यासाठी, लेखी तरतूद करता येईल.

**बैठकीचे स्थान.** **१२.** विशेष न्यायालयाला, स्वतःहून, किंवा सरकारी अभियोक्त्याने केलेल्या अर्जावरून, आणि तसे करणे इष्ट किंवा आवश्यक वाटत असेल तर, त्याच्या कोणत्याही कार्यवाहीसाठी त्याच्या न्यायपीठाच्या सर्वसाधारण ठिकाणाव्यतिरिक्त कोणत्याही ठिकाणी बैठक आयोजित करता येईल.

**विशेष न्यायालयांची अधिकारिता.** **१३.** (१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अभिकरणाने अन्वेषण केलेल्या प्रत्येक अनुसूचित अपराधाची न्यायचौकशी, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत तो अपराध घडला होता केवळ अशाच विशेष न्यायालयाकडून करण्यात येईल.

(२) राज्यातील प्रचलित परिस्थितीची निकड लक्षात घेता, जर,—

(क) न्याय्य, निःपक्षपाती किंवा जलदगतीने न्यायचौकशी करणे शक्य नसेल तर ; किंवा

(ख) शांतता भंग न होता किंवा आरोपी, साक्षीदार, विशेष न्यायालयाचा सरकारी अभियोक्ता किंवा न्यायाधीश याच्या किंवा त्यांच्यापैकी कोणाच्याही सुरक्षिततेला गंभीर धोका न पोहोचता न्यायचौकशी करणे शक्य नसेल तर ; किंवा

(ग) ते अन्यथा न्यायाच्या हिताचे नसेल तर,

सर्वोच्च न्यायालयाला, विशेष न्यायालयासमोर प्रलंबित असलेले कोणतेही प्रकरण, त्या राज्यातील किंवा इतर कोणत्याही राज्यातील इतर कोणत्याही विशेष न्यायालयाकडे वर्ग करता येईल आणि उच्च न्यायालयाला, त्या राज्यात असलेल्या विशेष न्यायालयासमोरील कोणतेही प्रलंबित प्रकरण, राज्यातील इतर कोणत्याही विशेष न्यायालयाकडे वर्ग करता येईल.

(३) सर्वोच्च न्यायालयाला किंवा, यथास्थिति, उच्च न्यायालयाला, एकतर केंद्र सरकारच्या किंवा हितसंबंधित पक्षाच्या अर्जावरून, या कलमान्वये कार्यवाही करता येईल आणि असा कोणताही अर्ज, चालना अर्जाद्वारे करण्यात येईल आणि जेव्हा अर्जदार हा भारताचा महान्यायवादी असेल तेव्हा ती बाब खेरीज करून, शपथपत्र किंवा दृढकथन यांद्वारे त्या अर्जाला पुष्टी देण्यात येईल.

**इतर अपराधांच्या संबंधात विशेष न्यायालयांचे अधिकार.** **१४.** (१) कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करताना, विशेष न्यायालयास आरोपीवर संहिते अन्वये ठेवलेल्या इतर कोणत्याही अपराधाशी जर तो अपराध संबंधित असेल तर त्याच्या न्यायचौकशीच्या वेळी, अशा इतर अपराधाची देखील न्यायचौकशी करता येईल.

(२) कोणत्याही अपराधाची या अधिनियमान्वये कोणतीही न्यायचौकशी करण्याच्या ओघात, आरोपी व्यक्तीने या अधिनियमाखालील किंवा इतर कोणत्याही कायद्याखालील इतर कोणताही अपराध केला असल्याचे आढळून आले तर, विशेष न्यायालयास, अशा इतर अपराधाबद्दल अशा व्यक्तीस दोषी ठरविता येईल आणि या अधिनियमान्वये किंवा, यथास्थिति, अशा इतर कायद्यान्वये कोणताही शिक्षादेश देता येईल किंवा प्राधिकृत केलेली शिक्षा देता येईल.

**सरकारी अभियोक्ते.**

**१५.** (१) केंद्र सरकार, सरकारी अभियोक्ता म्हणून एखाद्या व्यक्तीची नियुक्ती करील आणि त्यास अपर सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ते म्हणून एका किंवा अधिक व्यक्तींची नियुक्ती करता येईल :

परंतु असे की, केंद्र सरकारला, कोणत्याही प्रकरणासाठी किंवा प्रकरणांच्या वर्गासाठी किंवा गटासाठी विशेष सरकारी अभियोक्त्याचीही नियुक्ती करता येईल.

(२) ज्या व्यक्तीने सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी वर्षे अधिवक्ता म्हणून व्यवसाय केला नसेल किंवा एखाद्या संघराज्यात किंवा राज्यात, सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी कायद्याच्या विशेष ज्ञानाची आवश्यकता असणारे कोणतेही पद धारण केले नसेल तर, अशी व्यक्ती, या कलमान्वये सरकारी अभियोक्ता, किंवा अपर सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त केली जाण्यास अर्ह असणार नाही.

(३) या कलमान्वये सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती, संहितेच्या कलम २ च्या खंड (प) च्या अर्थांतर्गत सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार त्यास संहितेच्या तरतुदी लागू होतील.

**विशेष न्यायालयांची कार्यपद्धती व अधिकार.**

**१६.** (१) विशेष न्यायालयास, अपराध घटित करणाऱ्या अशा तथ्यविषयक फिर्यादीवरून किंवा अशा तथ्यविषयक पोलीस अहवालावरून, न्यायचौकशीसाठी आरोपीला त्याच्याकडे सुपूर्द न करता, अशा कोणत्याही अपराधाची दखल घेता येईल.

(२) विशेष न्यायालयाकडून न्यायचौकशीयोग्य असलेला अपराध, तीन वर्षांपेक्षा अधिक नसलेल्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्हीं शिक्षांना पात्र असेल त्याबाबतीत, विशेष न्यायालयाला, संहितेच्या कलम २६० च्या पोटकलम (१) मध्ये किंवा कलम २६२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संहितेमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार संक्षिप्त रीतीने अपराधाची न्यायचौकशी करता येईल आणि संहितेची कलमे २६३ ते २६५ च्या तरतुदी, शक्य असतील तेथवर, अशा न्यायचौकशीला लागू होतील :

परंतु असे की, या पोटकलमान्वये संक्षिप्त न्यायचौकशी करण्याच्या ओघात, संक्षिप्त रीतीने न्यायचौकशी करणे इष्ट होणार नाही, अशा स्वरूपाचे ते प्रकरण आहे, असे विशेष न्यायालयाला दिसून येईल तेव्हा, विशेष न्यायालय, अशा अपराधाच्या न्यायचौकशीसाठी ज्यांची तपासणी झालेली असेल, अशा कोणत्याही साक्षीदारांना परत बोलावील आणि संहितेच्या तरतुदींद्वारे तरतूद केलेल्या रीतीने प्रकरणाची फेर-सुनावणी करण्याची कार्यवाही करील आणि उक्त तरतुदी या, दंडाधिकाऱ्याला व त्याच्यासंबंधात जशा लागू होतात, तशाच प्रकारे विशेष न्यायालयाला व त्यासंबंधात लागू होतील :

परंतु आणखी असे की, या कलमाखालील संक्षिप्त न्यायचौकशीमध्ये दोषसिद्ध झाल्याच्या कोणत्याही प्रकरणात, एका वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाचा आणि पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल, इतक्या द्रव्यदंडाचा शिक्षादेश विशेष न्यायालयाने देणे विधिसंमत असेल.

(३) या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, विशेष न्यायालयाला, कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, सत्र न्यायालयाचे सर्व अधिकार असतील आणि ते विशेष न्यायालय जणू काही सत्र न्यायालय होते, असे मानून, सत्र न्यायालयासमोरील न्यायचौकशीसाठी संहितेमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, शक्य असेल तेथवर, अशा अपराधाची न्यायचौकशी करील.

(४) या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, कलम १३ च्या पोटकलम (२) अन्वये विशेष न्यायालयाकडे वर्ग केलेल्या प्रत्येक प्रकरणावर, जणू काही असे प्रकरण अशा विशेष न्यायालयाकडे संहितेच्या कलम ४०६ अन्वये वर्ग करण्यात आले होते, असे मानून कार्यवाही करण्यात येईल.

(५) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु संहितेच्या कलम २९९ च्या तरतुदींना अधीन राहून, विशेष न्यायालयास, त्याला योग्य वाटल्यास, आणि त्याने नमूद करावयाच्या कारणास्तव आरोपीच्या किंवा त्याच्या वकिलाच्या अनुपस्थितीत, न्यायचौकशीसंबंधात कार्यवाही करता येईल आणि उलट तपासणीसाठी साक्षीदारास परत बोलावण्याच्या आरोपीच्या अधिकारास अधीन राहून, कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवता येईल.

**साक्षीदारांचे संरक्षण.**

**१७.** (१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष न्यायालयास इष्ट वाटल्यास, त्याची कारणे लेखी नमूद करून त्यास, या अधिनियमाखालील कामकाज कक्षांतर्गत चालविता येईल.

(२) विशेष न्यायालयासमोरील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, साक्षीदाराने किंवा अशा साक्षीदाराच्या संबंधात सरकारी अभियोक्त्याने, केलेल्या अर्जावरून, किंवा विशेष न्यायालयाने स्वतःहून, अशा साक्षीदाराच्या जीवाला धोका आहे याबाबत, त्याची खात्री पटली असेल तर, तशी लेखी कारणे नमूद करून अशा साक्षीदाराची ओळख व पत्ता गुप्त राखण्यासाठी, त्याला योग्य वाटतील अशा उपाययोजना करता येतील.

(३) विशेषतः आणि पोटकलम (२) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध येऊ न देता, विशेष न्यायालयास, त्या पोटकलमान्वये ज्या उपाययोजना करता येतील, त्या उपाययोजनांमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल—

(क) विशेष न्यायालयाकडून ठरविण्यात येईल अशा ठिकाणी कामकाज चालविणे ;

(ख) न्यायालयाचे आदेश किंवा न्यायनिर्णय किंवा जनतेला पाहावयास मिळण्यायोग्य असलेले प्रकरणाचे कोणतेही अभिलेख यांमध्ये साक्षीदारांची नावे व पत्ते नमूद करण्याचे टाळणे ;

(ग) साक्षीदारांची ओळख व पत्ते उघड होऊ नयेत, याची सुनिश्चिती करण्यासाठी कोणतेही निदेश देणे ; आणि

(घ) अशा न्यायालयासमोर प्रलंबित असलेली सर्व किंवा कोणतीही कार्यवाही कोणत्याही रीतीने प्रसिद्ध केली जाऊ नये, यासाठी जनहितार्थ निर्णय घेणे.

(४) पोटकलम (३) अन्वये घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचे किंवा निदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या व एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

**खटला भरण्यासाठी मंजुरी.**

**१८.** या अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात, अभिकरणाच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध किंवा त्याच्यावतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीशिवाय, कोणत्याही न्यायालयात कोणताही खटला, दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**विशेष न्यायालयाच्या न्यायचौकशीस अग्रक्रम असणे.**

**१९.** विशेष न्यायालयांकडून कोणत्याही अपराधाची या अधिनियमाखालील न्यायचौकशी ही कामकाजाच्या सर्व दिवशी, दररोज करण्यात येईल आणि या न्यायचौकशीस, इतर कोणत्याही न्यायालयातील (विशेष न्यायालय नसणाऱ्या) आरोपीविरुद्धच्या इतर कोणत्याही प्रकरणाच्या न्यायचौकशीपेक्षा अग्रक्रम असेल आणि अशा इतर प्रकरणाच्या न्यायचौकशीपेक्षा ही, न्यायचौकशी प्राधान्यक्रमाने संपविण्यात येईल आणि त्यानुसार अशा इतर प्रकरणाची न्यायचौकशी आवश्यकता वाटल्यास, आस्थगित ठेवण्यात येईल.

**नियमित न्यायालयांकडे प्रकरणे वर्ग करण्याचा अधिकार.**

**२०.** कोणत्याही अपराधाची दखल घेतल्यानंतर, विशेष न्यायालयाच्या मते तो अपराध विशेष न्यायालयाकडून न्यायचौकशी करण्यायोग्य नसेल त्याबाबतीत, विशेष न्यायालय, अशा अपराधाची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता त्याच्याकडे नसली तरीसुद्धा, अशा अपराधाची न्यायचौकशी करण्यासाठी ते प्रकरण, संहितेअन्वये अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे वर्ग करील आणि ज्या न्यायालयाकडे हे

प्रकरण वर्ग करण्यात आले असेल, त्या न्यायालयाला, जणू काही त्या न्यायालयानेच अपराधाची दखल घेतली होती असे मानून, त्या अपराधाची न्यायचौकशी करण्याची कार्यवाही करता येईल.

**२१.** (१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा वादकालीन आदेश नसलेला आदेश यांवरील अपील हे, तथ्ये व कायदा या दोन्हीनुसार उच्च न्यायालयात दाखल करण्यात येईल. **अपिले.**

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अपिलावर, उच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडून सुनावणी करण्यात येईल आणि शक्यतोवर अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत ते निकालात काढण्यात येईल.

(३) पूर्वोक्तप्रमाणे नमूद केले असेल त्या व्यतिरिक्त, विशेष न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा आदेश तसेच वादकालीन आदेश यांवरही कोणतेही अपील किंवा पुनरीक्षण, कोणत्याही न्यायालयात दाखल केले जाणार नाही.

(४) संहितेच्या कलम ३७८ च्या पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जामीन मंजूर करण्याच्या किंवा तो नाकारण्याच्या विशेष न्यायालयाच्या आदेशाविरुद्धचे अपील, उच्च न्यायालयात दाखल करण्यात येईल.

(५) या कलमाखालील प्रत्येक अपील, ज्याविरुद्ध ते दाखल करावयाचे असेल त्या न्यायनिर्णयाच्या, शिक्षादेशाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत दाखल करण्यात येईल :

परंतु असे की, तीस दिवसांच्या कालावधीमध्ये अपील दाखल न करण्यास अपीलकारास पुरेसे कारण होते, याबाबत उच्च न्यायालयाची खात्री पटली असेल तर, उच्च न्यायालयाला, उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही अपील विचारार्थ स्वीकारता येईल :

परंतु आणखी असे की, नव्वद दिवसांचा कालावधी संपल्यानंतर कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही.

**२२.** (१) राज्य शासनास, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही किंवा सर्व अधिनियमितीखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी एक किंवा अधिक विशेष न्यायालये घटित करता येतील. **विशेष न्यायालये घटित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

(२) या प्रकरणाच्या तरतुदी, पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाने घटित केलेल्या विशेष न्यायालयांना लागू असतील आणि त्या, पुढील फेरबदलांना अधीन राहून लागू होतील :—

(एक) कलमे ११ व १५ यांमधील "केंद्र सरकार" संबंधीच्या निर्देशांचा अन्वयार्थ, राज्य शासनाचे निर्देश म्हणून लावण्यात येईल ;

(दोन) कलम १३ च्या पोटकलम (१) मधील "अभिकरण" या संबंधीच्या निर्देशाचा अन्वयार्थ, "राज्य शासनाच्या अन्वेषण अभिकरणाचा" निर्देश म्हणून लावण्यात येईल ;

(तीन) कलम १३ च्या पोटकलम (३) मधील "भारताचे महान्यायवादी" याच्या संबंधीच्या निर्देशाचा अन्वयार्थ, "राज्याचा महाअधिवक्ता" याच्या संबंधीचा निर्देश म्हणून लावण्यात येईल.

(३) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत, पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाकडून विशेष न्यायालय घटित होईपर्यंत, विशेष न्यायालयाला या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारितेचा वापर, संहितेमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, ज्या विभागात असा अपराध घडलेला असेल, त्या विभागाच्या सत्र न्यायालयाकडून करण्यात येईल आणि त्या सत्र न्यायालयाला, या प्रकरणान्वये तरतूद केलेले सर्व अधिकार असतील व ते, या प्रकरणाखालील कार्यपद्धतीचे अनुसरण करील.

(४) ज्या दिनांकास राज्य शासनाकडून विशेष न्यायालय घटित करण्यात आले असेल, त्या दिनांकास व तेव्हापासून, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये राज्य शासनाने अन्वेषण केलेल्या ज्या अपराधाची न्यायचौकशी

विशेष न्यायालयापुढे करणे भाग पडले असते अशा कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी, ज्या दिनांकास ते न्यायालय घटित करण्यात आले असेल, त्या दिनांकास त्या न्यायालयाकडे वर्ग होईल.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

**उच्च न्यायालयांचा नियम करण्याचा अधिकार.**

**२३.** उच्च न्यायालयास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याच्या क्षेत्रामध्ये येणाऱ्या विशेष न्यायालयांच्या संबंधात, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, त्यास आवश्यक वाटतील असे नियम करता येतील.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**२४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, जर कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकारला, ती अडचण दूर करण्यासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येतील :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षे समाप्त झाल्यानंतर, या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**नियम करण्याचा अधिकार.**

**२५.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :—

(क) कलम ५ अन्वये अभिकरण घटित करण्याची रीत आणि त्या अभिकरणामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या सेवाशर्ती ;

(ख) विहित करण्याची आवश्यकता असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**नियम मांडणे.**

**२६.** या अधिनियमान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवण्यात येईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे त्या नियमान्वये यापूर्वीच करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## अनुसूची

[ कलम २ (१) (च) पहा ]

१. अणुऊर्जा अधिनियम, १९६२ (१९६२ चा ३३) ;

२. बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ (१९६७ चा ३७) ;

३. विमान अपहरण प्रतिबंधक अधिनियम, १९८२ (१९८२ चा ६५) ;

४. नागरी विमान चालनाच्या सुरक्षिततेसाठी बेकायदेशीर कृत्यांचे दमन अधिनियम, १९८२ (१९८२ चा ६६) ;

५. सार्क अभिसंधी (दहशतवादाचे दमन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा ३६) ;

६. सागरी नौकानयनाच्या सुरक्षिततेसाठी बेकायदेशीर कृत्यांचे दमन आणि सागरमग्न खंडभूमीवरील स्थिर फलाट अधिनियम, २००२ (२००२ चा ६९) ;

७. महासंहारक शस्त्रे व त्यांची प्रेषण यंत्रणा (बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध) अधिनियम, २००५ (२००५ चा २१) ;

८. (क) भारतीय दंड संहितेचे (१८६० चा ४५) प्रकरण सहा [ कलम १२१ ते १३० (दोन्ही धरून) ] ;

(ख) भारतीय दंड संहितेची (१८६० चा ४५) कलमे ४८९-क ते ४८९-ङ ; (दोन्ही धरून), यांखालील अपराध.